# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:31.03.2026** **वार: मंगळवार**

1. जनगणनेच्या प्रक्रियेला उद्यापासून देशभरात सुरुवात; पहिल्या टप्प्यात घर गणना आणि स्व–गणना.
2. देशातील नक्षलवाद संपवण्यासाठी विविध यंत्रणांनी केलेल्या प्रयत्नांमुळे, आता प्रभावित भागांपर्यंत विकास पोहोचत असल्याची केंद्रीय गृहमंत्र्यांची लोकसभेत माहिती.
3. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नेदरलँड्सचे पंतप्रधान रॉब जेटेन यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा आणि
4. भगवान महावीर जयंतीनिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन

**जनगणना**

देशातील जनगणना 2027 ची तयारी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. पहिला टप्पा उद्या म्हणजे 1 एप्रिलपासून सुरू होणार असून तो येत्या 30 सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे अशी माहिती जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार यांनी दिली आहे. याआधीची जनगणना 2011 मध्ये झाली होती. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घरांची स्थिती, उपलब्ध सुविधा यांची माहिती घेतली जाणार आहे. नागरिकांना प्रथमच स्व-गणनेचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला असून, विशेष मोबाईल ॲप आणि पोर्टलच्या माध्यमातून घरी बसून माहिती भरता येणार आहे. हे पोर्टल 16 भाषांमध्ये उपलब्ध असेल. माहिती भरल्यानंतर नागरिकांना 11 अंकी 'AC ID' दिला जाईल. दुसऱ्या टप्प्यात वैयक्तिक माहिती संकलित केली जाईल आणि संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात होणार आहे. तसेच या टप्प्यात जातीनिहाय गणनाही केली जाणार आहे.

**अमित शहा**

डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी कारवायांमुळे प्रभावित भागांमधील विकासाला खीळ बसली होती, परंतु आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात या भागांपर्यंत विकास पोहोचत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. देश नक्षलवाद मुक्त करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांवर लोकसभेत झालेल्या चर्चेला काल त्यांनी उत्तर दिलं. शस्त्र उचलणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असं शहा यांनी स्पष्ट केलं......

**ये जो वकील बन रहे हैं एक हथियारी मूवमेंट के कहते हैं हम अन्याय के खिलाफ लड़ेंगे। संविधान को मानोगे या नहीं मानोगे किसी को भी अन्याय होता है। इसका उपाय हमारे संविधान के अंदर निहित अदालतें बनी हैं, विधानसभाएं बनी हैं, जिला पंचायतें बनी हैं, तहसील पंचायत बनी है कि पूरी व्यवस्था को नकार कर कर हाथ में हथियार उठा लोगे ऐसा कैसे चलेगा और जस्टिफाई जो करे उनको मैं कहना चाहता हूं वो समय चला गया कि नरेन्द्र मोदी की सरकार है जो हथियार उठाएगा उसको हिसाब इस तरह से नहीं चलेगा।**

नक्षलग्रस्त 12 राज्यांमध्ये डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी कारवायांमुळे 20 हजार लोकांचा मृत्यू झाला आणि जवळपास 12 कोटी लोक अनेक वर्षे विकासापासून वंचित राहिले, असं शहा म्हणाले. नक्षलवाद नष्ट करून या भागात विकासाची गंगा पोहोचवण्यासाठी गेल्या 12 वर्षात केलेल्या विविध उपाययोजनांची त्यांनी माहिती दिली. 2024 ते मार्च 2026 या कालावधीत 706 नक्षलवादी चकमकीत ठार करण्यात आले, 2 हजार 218 नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली, तर 4 हजार 839 नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करलीअशी माहिती त्यांनी दिली. नक्षलवादाविरुद्धच्या मोहिमेत प्राण गमावलेल्या जवानांना त्यांनी श्रद्धांजली वाहिली.

**अर्थमंत्री**

भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया आणि मूलभूत संरचना या जागतिक अस्थिरतेच्या काळातही मजबूत असल्याचं, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या काल लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलत होत्या. जगभरातल्या सर्वच देशांचं चलन या युद्ध परिस्थितीमुळे प्रभावित झालं आहे, तर आपल्या देशात महागाई कमी झाली, एकूण देशांतर्गत उत्पन्न-जीडीपी सात टक्क्याहून अधिक दराने वाढत आहे, आणि चालू खात्यातली तूट एक टक्क्याहून कमी असल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं.

**राष्ट्रपती-बिहार कर्नाटक**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवस बिहार आणि कर्नाटकच्या दौऱ्यावर जाणार आहेत. आज दौऱ्याच्या पहिल्या दिवशी त्या बिहारमधील राजगीर येथे होणाऱ्या नालंदा विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभास उपस्थित राहणार आहेत. तर उद्या कर्नाटकच्या तुमकूरू येथील श्री सिद्धगंगा मठात, डॉ. श्री श्री शिवकुमार महास्वामीजी यांच्या ११९ व्या जयंती आणि 'गुरुवंदना' सोहळ्यात सहभागी होतील.

**मोदी-नेदरलँड्स**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नेदरलँड्सचे पंतप्रधान रॉब जेटेन यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. या संभाषणादरम्यान भारत आणि नेदरलँड्स यांच्यातील संबंध अधिक दृढ करण्याच्या मुद्यांवर चर्चा झाली असल्याचं मोदी यांनी समाज माध्यमांवर म्हटलं आहे. या चर्चेत सेमीकंडक्टर्स, जलप्रकल्प, हरित हायड्रोजन यांसारख्या क्षेत्रांमधे लवकरच भागीदारी होण्याची शक्यता होणार असल्याचंही मोदी यांनी म्हटलं आहे. त्याचबरोबर दोन्ही नेत्यांनी पश्चिम आशियातील परिस्थितीबाबतही चर्चा केली, या प्रदेशात लवकरात लवकर शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित होण्याच्या गरजेवर दोन्ही नेत्यांनी भर दिला.

**मोदी-गुजरात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज गुजरातच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर जाणार असून वाव-थराद इथं त्यांच्या हस्ते 19 हजार 806 कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विकास कामांचं लोकार्पण आणि भूमिपूजन होणार आहे. 10 हजार 921 कोटी रुपये खर्चाचे हे प्रकल्प ऊर्जा क्षेत्र, रस्ते वाहतूक आणि महामार्ग तसंच रेल्वे मंत्रालयाशी संबंधित आहेत. याव्यतिरिक्त, गुजरात सरकारच्या नगर विकास, जलसंपदा, पाणीपुरवठा, रस्ते आणि इमारती, गुजरात औद्योगिक विकास महामंडळ, आरोग्य आणि कुटुंब कल्याण, पर्यटन आणि आदिवासी विकास विभागांशी संबंधित 8 हजार 886 कोटी रुपयांच्या विकास कामांचाही शुभारंभ मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

**महावीर जयंती**

24 वे आणि अखेरचे जैन तीर्थंकर, भगवान महावीर यांची जयंती-महावीर जयंती-आज संपूर्ण देशभरात उत्साहात साजरी केली जात आहे. या निमित्तानं देशभरातील जैन स्थानकांमध्ये प्रार्थना, प्रवचन, यासारखे धार्मिक कार्यक्रम होत आहेत, ठीकठिकाणी महावीर जयंती निमित्त रथयात्रांही काढण्यात येत आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी महावीर जयंतीनिमित्त देशवासीयांना, विशेषतः जैन बांधव आणि भगिनींना शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान महावीरांची अहिंसा, सत्य, अस्तेय म्हणजे चोरी न करणे, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह ही पाच तत्वे प्रत्येकाला जीवनात योग्य मार्गावर चालण्याची प्रेरणा देतात असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**ट्रम्प-इराण**

युद्ध संपवण्यासाठी लवकर करार झाला नाही, तर इराणच्या ऊर्जा आणि जल प्रकल्पांसारख्या इतर महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणावर नाश करण्याची धमकी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. अमेरिकी सैन्य इराणच्या खार्ग बेटावरील तेल निर्यात केंद्र ताब्यात घेऊ शकते असंही ट्रम्प यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हटलं आहे. तर दुसरीकडे आपल्या भूभागावर आक्रमण झाल्यास पर्शियन आखातात सुरुंग पेरण्याची धमकी इराणने दिली आहे.

दरम्यान अमेरिका आणि इस्रायलने कालही आपले हल्ले सुरूचं ठेवले; तर इराणने कुवेतमधील जल आणि वीज प्रकल्पावर हल्ला केला तसंच इस्रायलमधील एका तेल शुद्धीकरण प्रकल्पावरही हल्ला केला.

**इस्रायल-पॅलेस्टिन**

इस्रायली नागरिकांच्या हत्येप्रकरणी दोषी ठरलेल्या पॅलेस्टिनींना मृत्युदंडाची शिक्षा देणारा कायदा इस्रायलच्या संसदेने मंजूर केला आहे. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी स्वतः सभागृहात येऊन या विधेयकाच्या बाजूने मतदान केले होते. तसंच या कायद्यामुळे इस्रायली न्यायालयांना त्यांच्या स्वतःच्या नागरिकांवर मृत्युदंड किंवा जन्मठेपेची शिक्षा देता येणार आहे. ही शिक्षा पूर्वलक्षी प्रभावाने लागू न होता केवळ भविष्यातील प्रकरणांनाच लागू होणार आहे. हा कायदा वांशिक भेदभाव करणारी, कठोर आणि पॅलेस्टिनी हल्लेखोरांना रोखण्यात अपयशी ठरेल असं सांगत इस्रायली आणि पॅलेस्टिनी मानवाधिकार संघटनांनी या कायद्यावर तीव्र टीका केली आहे. या निर्णयाविरुद्ध इस्रायलच्या सर्वोच्च न्यायालयात कायदेशीर आव्हान दिले जाण्याची शक्यता आहे.

**चारधाम यात्रा**

उत्तराखंडमध्ये, चार धाम यात्रा सुरळीत आणि सुरक्षितपणे पार पडावी यासाठी व्यावसायिक प्रवासी वाहनांकरिता 'ग्रीन कार्ड प्रणाली' सुरू करण्यात आली आहे. परिवहन मंत्री प्रदीप बत्रा यांनी काल हरिद्वार जिल्ह्यातील रोशनबाद येथे या प्रणालीचे उद्घाटन केले. या प्रणालीमुळे व्यावसायिक वाहनांची तांत्रिक क्षमता आणि सुरक्षितता योग्य असल्याची माहिती मिळणार आहे. त्याबरोबरच आपत्कालीन परिस्थितीत वाहनाशी संबंधित आवश्यक माहिती उपलब्ध होण्यासदेखील मदत होणार आहे.

**शीतलदेवी**

भारताच्या शीतल देवीला 'पॅरा आर्चर ऑफ द इयर 2025' म्हणून गौरवण्यात आलं आहे. जम्मू-काश्मीरची 19 वर्षीय खेळाडू, दक्षिण कोरियातील ग्वांगजू येथे झालेल्या जागतिक पॅरा तिरंदाजी चॅम्पियनशिपमध्ये महिलांच्या कंपाऊंड प्रकारात अव्वल स्थान पटकावून सुवर्णपदक जिंकणारी पहिली महिला तिरंदाज ठरली.

**IPLनिकाल**

IPL क्रिकेटमध्ये, काल रात्री गुवाहाटीच्या बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने चेन्नई सुपर किंग्सचा आठ गडी राखून पराभव केला. चेन्नई सुपरकिंग्सने विजयासाठी ठेवलेल्या 128 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, 13व्या षटकांतच हे उद्दिष्ट पार केलं. राजस्थान रॉयल्सकडून वैभव सूर्यवंशीने 17 चेंडूंत 52 धावांची वेगवान खेळी केली. राजस्थान रॉयल्सच्या नँद्रे बर्गरला 'सामनावीर' पुरस्काराने गौरविण्यात आलं.

**हवामान**

महाराष्ट्राच्या काही भागात काल अवकाळी पाऊस पडला; पुण्यासह काही ठिकाणी गारपीटही झाली. या पावसाने अनेक जिल्ह्यांमध्ये पिकांचं नुकसान झालं असून जनजीवनही विस्कळीत झालं. जालना जिल्ह्यात वीज कोसळून दोघांचा मृत्यू झाला. येत्या 3-4 दिवसात राज्याच्या सर्वच भागात पावसाचा अंदाज असून तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.